V-1/ACT 77

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

जा.क्र.सनिमा/वि-१/प्राधिकृत अधिकारी/रोझरी पत./२०१८
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालवण
ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग
दिनांक : ०८/०२/२०१८

संदर्भ : १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुद
२) या कार्यालयाकडील जा.क्र.सनिमा/वि-१/का.क.७७ (ब-१) नोटीस/२०१८, दि.०१/०१/२०१८ ची नोटीस.

ज्याअर्थी, रोझरी ख्रिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग, नोंदणी क्रमांक एसडीजी/एमएलएन/आरएसआर/(सीआर)७५६/सन १९९६, दिनांक ०८/०७/१९९६ हि नोंदणीकृत सहकारी संस्था असून तीचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम व पोटनियम यांना अनुसरुन असणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, संस्था पोटनियम क्रमांक ३९ प्रमाणे निवडणुकीने निवडून यावयाचे एकूण १३ समिती सदस्य असून त्यापैकी निवडून आलेले ८ समिती सदस्य आहेत. या ८ समिती सदस्यापैकी २ समिती सदस्य यांचे संस्था पोटनियम क्र.३९ (८) व कलम ७३ क अ प्रमाणे सदस्यत्व बंद झाले असले बाबतचे आदेश या कार्यलयाने जा.क्र. सनिमा/वि-१/कलम ७३ क अ (४) / आदेश /२०१७, दि.२४.१०.२०१७ व जा.क्र. सनिमा/वि-१/कलम ७३ क अ (४) / आदेश /२०१७, दि.२४.१०.२०१७ ने निर्गमीत केलेले होते. तसेच संस्थेने जा.क्र.२८५, दि.२६.१२.२०१७ ने कळविले आहे की, संस्थेचे एक समिती सदस्य श्री.नोऱ्होन, बस्त्याव घाब्रियल हे दि.२०.०१.२०१७ ते १९.११.२०१७ पर्यंत सलग ११ सभांना लेखीकारण न देता अनुपस्थित राहीले आहेत. त्यामुळे संस्था पोटनियम क्रमांक ४४ (११) प्रमाणे सततच्या ३ संचालक मंडळ सभांना अनुपस्थित राहिल्यास सदस्य अपात्र ठरतो. हि बाब लक्षात घेता संस्थेच्या निवडून आलेल्या समिती सदस्यांची संख्या हि ५ एवढी झालेली आहे. त्यामुळे कलम ७७ अ (ब-१) नुसार संस्थेच्या समितीच्या रचनेत पुढील प्रमाणे दोष निर्माण झालेले आहेत. समितीच्या रचनेत दोष निर्माण झालेला असल्याने उक्त संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (ब-१) नुसार प्राधिकृत अधिकारी का नियुक्त करण्यात येऊ नये ? या बाबत संदर्भिय नोटीशीव्दारे संस्थेकडे खुलासा मागणेत आला होता. त्याबाबत संस्थेने खुलासा केला आहे की, संस्थेची संचालक समिती सदस्य संख्या गणपुर्तीस आवश्यक तेवढी नाही. त्यामुळे संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक होऊ शकते याची जाणीव आहे. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झालेला आहे.

त्याअर्थी, संस्थेची निवडणूक होऊन नविन समितीची रितसर रचना होई पर्यंत संस्थेचे कामकाज पहाण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे संयुक्तीक आहे. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ ( १-अ ) ( ब-१) व दोन अन्वये मी के.आर.धुळप, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालवण मला प्राप्त झालेल्या अधिकारापरत्वे रोझरी ख्रिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग या संस्थेवर श्री. अे.एल.हिर्लेकर, सहकारी अधिकारी श्रे.२, अधिन, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मालवण यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी तात्काळ संस्थेचे व्यवस्थापन हाती घेऊन सहा महिन्याचे आत नवीन समिती कायदेशिररित्या निवडून येण्यासाठी कार्यवाही करावी व कामकाजाचा अहवाल सादर करावा.

हा आदेश माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रा नोंद करुन आज दिनांक ०८/०२/२०१८ रोजी निर्गमीत केला आहे.

(के.आर.धुळप)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, मालवण

प्रति,
१ ) माजी चेअरमन, रोझरी ख्रिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग
२) सचिव, रोझरी ख्रिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग
३) श्री.अे.एल.हिर्लेकर, प्राधिकृत अधिकारी रोझरी ख्रिश्चन ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मालवण, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग

आपणास सुचित करण्यात येते की, सदर आदेशाची नोंद घेऊन चार्ज देणे घेणे बाबत कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१) मा.सचिव, राज्य् सहकारी निवडणूक प्राधिकरण, म.रा.पुणे
२) मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सिंधुदुर्ग
३) मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, मालवण